रयत शिक्षण संस्था | RAYAT SHIKSHAN SANSTHA
संस्थापक: कर्मवीर भाऊराव पाटील Founder: Karmaveer Bhaurav Patil
स्थापना: १९१९ Established: 1919
Central Office, Karmaveer Samadhi Parisar, Near Powai Naka, Satara - 415 001.

परिपत्रक नं. ३४

आस्था. माध्य. विभाग
दिनांक = १४/०९/२०१७

# अत्यंत महत्वाचे

प्रति,
शाखाप्रमुख,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ट महाविद्यालये,
रयत शिक्षण संस्था,

विषय : **E-Library content** आणि त्याची यादी पाठविणेबाबत.

रयत शिक्षण संस्थेच्या, माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक यांना डिजिटल च्या स्वरूपामध्ये इंटरनेटच्या माध्यमातून www.erayat.org या वेबसाईट व्दारे जवळजवळ 100 जीबी एवढ्या माहितीचे एकत्रीकरण करून रयत नॉलेज बँक हा साठा विनामोबदला उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये असणाऱ्या माहितीचा उपयोग शिक्षक आणि विद्यार्थी आपल्या अभ्यासातील घटकांना पूरक म्हणून करू शकतात आणि दैनंदिन ज्ञानार्जन करताना याचा निश्चितच उपयोग होईल.

आपण आपल्या विद्यालयातील व महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास हे परिपत्रक आणून द्यावे. आणि आपल्या अध्यापन पध्दती मध्ये (Digital Education ) याचा अधिकतर वापर कसा करता येईल हे पाहावे.

तसेच आपल्या विद्यालयातील व महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षकांनी अध्यापन करत असताना तयार केलेली माहिती जसे कि पीपीटी, ईबुक, व्हिडीओ याची इयत्तानुसार वर्गवारी करून आमच्यापर्यंत पोहोचवावी. तुम्ही पाठवलेली माहिती त्या शिक्षकाच्या नावाने या रयत नॉलेज बँक मध्ये प्रसिद्ध केली जाईल. आणि याचा उपयोग जगातील कोणतीही व्यक्ती विनामूल्य करू शकेल. सदर माहिती सोबतच्या तक्त्यानुसार पाठविण्यात यावी.

PPT साठी तक्ता खालीलप्रमाणे

| अ. न. | विद्यालयाचे / महाविद्यालयाचे नाव | शिक्षकाचे नाव | मोबाईल क्रमांक | शिकवीत असलेला विषय | पीपीटी ची संख्या | पीपीटी चा विषय | ई-बुक ची संख्या | ई-बुक चे नाव | व्हिडीओ ची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

पान नं.२ वर . . . .

e-book साठी तक्ता खालीलप्रमाणे

| अ.न. | विद्यालयाचे / महाविद्यालयाचे नाव | शिक्षकाचे नाव | मोबाईल क्रमांक | शिकवीत असलेला विषय | e-book चे नाव | e-book विषय | e-book संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

Video साठी तक्ता खालीलप्रमाणे

| अ.न. | विद्यालयाचे / महाविद्यालयाचे नाव | शिक्षकाचे नाव | मोबाईल क्रमांक | शिकवीत असलेला विषय | Video विषय | Video संख्या | Video कोणत्या Source वरुण घेतला त्याचा संदर्भ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**पीपीटी साठी सूचना – हिंदी / मराठी असेल तर**

१) सदर पीपीटी फक्त Unicode (मंगल) फॉन्ट चा वापर करून तयार केलेली असावी. इतर कोणतेही फॉन्ट यामध्ये वापरू नयेत. ISM किंवा शिवाजी, श्री लिपी सारखे कोणतेही फॉन्ट वापरू नयेत. English साठी Times New Roman font वापरावा

२) पीपीटी च्या पहिल्या स्लाईड वर संबंधित शिक्षकाचे नाव, विषयाचे नाव आणि इयत्ता याचा उल्लेख असावा.

३) आपण आपल्या विद्यालयातील / महाविद्यालयातील शिक्षकाने तयार केलेली पीपीटी पाठवीत असताना पूर्ण तपासूनच पाठवावी (एक PPT स्क्रुटिनी कमिटी करून तपासाव्यात) .

४) पीपीटी मध्ये कमीत कमी २० स्लाईड असाव्यात.

५) प्रत्येक शिक्षकांनी कमीत कमी २ पीपीटी तरी केलेल्या असाव्यात.

६) पीपीटी मध्ये कमीत कमी शब्दात आपला विषय मांडणी केलेली असावी, विषयाला अनुसरून रंगसंगती, चित्रे यांचा वापर केलेला असावा.

७) पीपीटी ला कोणतेही Animation देऊ नये.

संदर्भ - PPT कशी बनवावी यासंदर्भात youtube वर आपण Rayat Shikshan Sanstha live. PPt guide याद्वारे माहिती मिळवू शकता

पान नं.3 वर . . . .

**ईबुक साठी सूचना –**

१) ईबुंक पाठवीत असताना त्यांची नावे वरील तक्त्यामध्ये लिहावीत. तसेच कॉपीराईट असलेली ईबुक असतील तर तसा संदर्भ द्यावा. किवा ते कोणत्या वेबसाईट वरुन घेतले आहे त्याचा सदर्भ द्यावा.

२) ईबुक साठीची यादी करून पाठवावी

**व्हिडीओसाठी सूचना –**

१) व्हिडीओ पाठवीत असताना त्यांची नावे सोबतच्या तक्त्यामध्ये लिहावीत. तसेच कॉपीराईट असलेली व्हिडीओ असतील तर तसा संदर्भ द्यावा.

२) सदर माहिती – ऑनलाईन पाठवीत असताना –आपल्या विद्यालयाच्या / महाविद्यालयाच्या ईमेल चा वापर करून पाठवावी. स्वत:चा कोणताही ईमेल वापरू नये.

३) तसेच व्हिडीओ, ईबुक पाठवीत असताना- त्याची फोल्डर नुसार वर्गवारी करूनच ऑनलाईन अथवा ऑफलाईन स्वरुपात सीडी अथवा डीव्हीडी व्दारे पाठवू शकता.

४) तसेच आपण जी माहिती पाठवीत आहात त्या फाईल ला त्याच विषयाचे नाव देणे महत्वाचे आहे.

आपण ऑफलाईन द्वारे P.P.T. Ebook, video,
सीडी, डीव्हीडी, द्वारे पाठवू शकता

सदर Data व माहिती दिनांक १६/०९/२०१७ पर्यंत कर्मवीर विद्याप्रबोधिनी सातारा येथे पाठवावी.

सहसचिव (माध्य.),
रयत शिक्षण संस्था, सातारा